# पवना सहकारी बँक लि, पुणे

मुख्य कार्यालय – एच ब्लॉक, प्लॉट नं. सी-२०, पिंपरी औद्योगीक वसाहत ॲटोक्लस्टर जवळ, चिंचवड, पुणे-१९.
फोन नं : ०२० ६७१७१६००/०१/०२/०३/०४/०५/०६ वेबसाईट : www.pavanabank.com

## जाहीर सूचना (सर्व ग्राहक व सभासदांसाठी)

बँकेच्या सर्व खातेदारांना कळिवण्यात येते की, भारतीय रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचना व Prevention of Money laundering Act, २००२ (As amended) च्या तरतुदीनुसार, बँक मागणी करेल त्या वेळी तसेच पुढील विशेष बाबतीत KYC ची अद्ययावत (Updated) कागदपत्रे आपण सादर करणे बंधनकारक आहे.

**KYC/Re-KYC:-** रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, खाते उघडताना अद्ययावत KYC कागदपत्रे बँकेस सादर करणे अनिवार्य आहे. आपल्या खात्याचे बँकेमार्फत जोखीम वर्गीकरण केले जाते. त्यानुसार आपल्या खात्यास सादर केलेल्या कागदपत्रांची मुदत संपली असेल तर अथवा दि.३१/०३/२०२६ अखेर संपत असेल तर आपण दिलेल्या पत्त्यावर पत्राद्वारे व आपल्या नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएस द्वारे संपर्क साधण्यात येईलच, आपणांस विनंती की, आपण KYC/OVD (Officially Valid Document) पुर्ततेसाठी जाहीर सूचनेच्या दिनांकापासून ३० दिवसांचे आत अद्ययावत कागदपत्रे नजिक च्या शाखेत सादर करावीत, वरील कालावधीमध्ये आपण कागदपत्रे सादर केली नाहीत तर बँकेस आपल्या खात्यावरील व्यवहार नाईलाजास्तव थांबवावे लागतील. जर कागदपत्रांमध्ये काही बदल नसल्यास यासाठी Re-KYC बाबत स्वःयं घोषणापत्र भरुन देण्यात यावे.

**Inoperative/Dormant खात्यांसाठी:-** सदर आपले खाते कोणत्याही कारणाने सलग २ वर्षे आपण वापरले नसेल तर सदर खाते Inoperative/Dormant म्हणून गणले जाते. सदर खाते पुन्हा कार्यान्वित करण्यासाठी आपण शाखा स्तरावर उपलब्ध करण्यात आलेला निर्धारित/विहीत फॉर्म पूर्ण भरुन व अद्यावत KYC कागदपत्रे सादर करुन व्यवहार करणे आवश्यक आहे.

**CKYC:-** आपल्या खात्याची CKYC झाली आहे की नाही ते तपासण्यासाठी आपण CERSAI च्या अधिकृत Website: htts://www.ckycindia.in/kyc/single वर पडताळणी करु शकता. तसेच ७७९९०२२१२९ या टोल फ्री क्रमांकावर मिस्डकॉलद्वारे CKYC क्रमांकची माहिती घेऊ शकता. आपले खाते बँके साठी बहुमूल्य आहे, ते व्यवहार पूर्ण चालू रहावे, यासाठी आपल्या सहकार्याची अपेक्षा आहे. त्याचप्रमाणे ज्या ग्राहकांकडे सरसाई चा CKYC क्रमांक आहे. अशा ग्राहकांनी त्याची प्रत बँकेस सादर करावी. जर नोंदणी प्रक्रिया अद्यापही अपूर्ण अथवा केली नसेल, तर नजिकच्या शाखेशी संपर्क साधून ती प्रकिया लवकर पूर्ण करुन घ्यावी. कोणतीही कागदपत्रे बँकेस सादर करताना मूळ कागदपत्रे व त्याची झेरॉक्स प्रत समक्ष सादर करावी. तसेच तपासणी नंतर मूळ कागदपत्रे त्वरीत ताब्यात घ्यावीत.

**Locker Holder:-** आपण जर लॉकर सुविधेचा लाभ घेत असाल तर कृपया लॉकर भाडे करार नव्याने करुन दिल्याची खात्री करावी आणि सदर लॉकर नियमीतपणे ऑपरेट केलेले असावे.

**Updation of Mobile No./ Email ID/Nominee:** सध्या सायबर फसवणूकीच्या घटनांचे प्रमाण वाढले आहे. सुरक्षिततेच्या कारणासाठी १) आपल्या खात्यास Email व मोबाईल नंबर नोंदवावा. २) Message/SMS द्वारे संपर्कामुळे संभाव्य घटना टाळता येवू शकतील ३) सर्व ठेवीदारांनी ठेव खात्यावर नामांकन (वारस नोंद) करावी.

**Share Certificate & Dividend:** जे ग्राहक बँकेचे सभासद आहेत. ज्या सभासदांनी आपले शेअर सर्टीफीकेट अद्याप नेले नसतील त्यांनी आपल्या शाखेतुन घेवून जावीत. त्याच प्रमाणे आपला लांभाश जमा करण्यासाठी संलग्न खाते सभासद खात्यास जोडावे.

**DICGC:** ठेव खात्यातील रु. ५.०० लाखापर्यंतच्या रक्कमा DICGC द्वारे विमाकृत असून या करीता आपल्या खात्याची केवायसी (KYC) अद्यावत असणे आवश्यक आहे.

**Cyber Security:** कृपया तुमचे Debit Card / Mobile Banking / UPI याबाबतची माहिती जसे की, PIN, CVV, OTP, MPIN, TPIN इत्यादी कोणालाही SMS/E-mail/ फोनद्वारे अथवा तोंडी अपरिचीत व्यक्तींना शेअर करू नयेत. बँक कधीही तुम्हाला अशी माहिती विचारात नाहीत. याबाबत आपण नेहमी सतर्क रहावे. आपल्या बरोबर झालेल्या ऑनलाईन सायबर फसवणुकीची तक्रार १९३० या सायबर सेल क्रमांकावर करावी.

**Money Mule Account:** आपले खाते आपण स्वतःच वापरा. थोड्या रकमेच्या अमिषाला आर्थिक बळी पडून नका. आपले एटीएम कार्ड दुसऱ्या त्रयस्त व्यक्तीच्या हातात देऊ नका.

**Unclaim Deposits:** दहा वर्षापेक्षा अधिक कालावधी पासून ठेव खात्यामध्ये व्यवहार न झालेल्या व मागणी न केलेल्या ठेवी ह्या आरबीआयच्या डिपॉझिटरी इज्युकेशन ॲन्ड अवेरनेस फंड (DEA-Fund) मध्ये वर्ग करण्यात येतात. शाखा कार्यालये व बँकेच्या वेबसाईटवर अशी यादी प्रकाशीत करण्यात आलेली आहे. यादीतील ग्राहकांनी किंवा ग्राहक हयात नसल्यास ग्राहकांचे वारसांनी बँकेच्या शाखा कार्यालयाशी संपर्कसाधून माहिती घ्यावी व संबंधीत रक्कम मागवण्याची कार्यवाही करावी. त्याच प्रमाणे नियमीत ठेवीदारांचे निधनानंतर त्यांचे वारसांनी बँकेशी संपर्क साधुन अशा ठेवीची वेळीच मागणी करावी.

आपल्याला अधिक चांगल्या प्रकारे सेवा देण्याची संधी द्यावी. अधिक माहितीकरीता नजीकच्या शाखा व्यवस्थापकांशी अथवा बँकेच्या टोल फ्री क्रमांक १८०० २६६ ४७४७ वर, तसेच या अधिकृत https://www.pavanabank.bank.in/ वेबसाईटवर संपर्क साधावा.

स्थळ : चिंचवड, पुणे
दिनांक : ३०/०३/२०२६

मुख्य कार्यकारी अधिकारी
पवना सहकारी बँक लि. पुणे